ॐ

# ज्ञान प्रबोधिनी माजी विद्यार्थी मंडळ

सौर आषाढ २९, शके १९३२
२०/७/२०१०

ज्ञान प्रबोधिनी एक बहुआयामी स्वयंसेवी संस्था व संघटना असली तरी सर्वांगीण शिक्षणासाठी प्रणाली निर्माण करणारी संस्था म्हणून अधिक प्रसिद्ध आहे. आपण सर्वजण या विशेष शिक्षणप्रणालीतून घडलो. क्रमिक शिक्षणाबरोबर शारीरिक, मानसिक, बौद्धिक विकसनाचे अनेक उपक्रम आपण अनुभवले. खेळ, कला, भटकंती, वाचन, श्रवण, दर्शन यातून आपल्या वैयक्तिक व सामाजिक जाणीवा विकसित झाल्या. जीवनाकडे बघण्याचे एक सर्वंकष तत्त्वज्ञान व व्यापक विचार देण्याचा प्रयत्न ज्ञान प्रबोधिनीतील शिक्षणप्रणालीमध्ये आहे.

कळत-नकळत वर्षे, दशके गेली. आयुष्याच्या विविध टप्प्यांवरून मागे वळून पाहताना आपणा सर्वांनाच ज्ञान प्रबोधिनीतील आपल्या पायाभरणीचे महत्त्व जाणवते. आपल्यापैकी काहींचे वैयक्तिक सुवर्ण-हिरक विकासाचे टप्पे पार पडले. आपल्या सगळ्यांच्या ज्ञान प्रबोधिनीचे सुवर्ण महोत्सवी वर्ष शके १९३४ (सन २०१२) आहे. सुवर्ण महोत्सवी टप्प्याच्या पूर्वतयारीचा एक भाग म्हणून 'ज्ञान प्रबोधिनी संशोधन व प्रशिक्षण संकुल' आपल्या जुन्या-थोरल्या वास्तूशेजारीच कै. आप्पांच्या निवासस्थानाच्या जागेवर दिमाखात उभे झाले आहे. या संकुलाचा उद्घाटन कार्यक्रम दि. १७ ऑगस्ट रोजी कै. आप्पांच्या जन्मतिथीला करावयाचा आहे.

त्यापूर्वी **रविवार दि. २५ जुलै रोजी गुरुपौर्णिमा** कार्यक्रमासाठी संध्याकाळी ५ ते ७ एकत्र जमूया. प्रथम गटागटांनी नवीन वास्तू पाहणे व अल्पोपहार असा कार्यक्रम असेल. त्यानंतर वर्गशः गप्पा व शेवटी एकत्र गुरुपौर्णिमा उपासना व गुरुदक्षिणेचा कार्यक्रम असेल. ७ नंतर अनौपचारिक रेंगाळणे व गप्पा होतीलच.

तुला आणि तुझ्या वर्गमित्रांना या मेळाव्याला सहकुटुंब येण्याचे आग्रहाचे निमंत्रण ! निमत्रण virtual असले तरी उपस्थिती प्रत्यक्षात नक्की असावी. तुझ्या addressbook मधील माजी विद्यार्थ्यांना व वर्गांच्या E-group वरती हे निमंत्रण पुढे पाठवावेस, ही विनंती.

शुभेच्छापूर्वक तुझे

| सुभाष देशपांडे | विवेक कुलकर्णी | महेंद्र सेठिया | मिलिंद नाईक | आशुतोष बारमुख |
|---|---|---|---|---|
| (१९६८) | (१९७३) | (१९८०) | (१९८९) | (१९९५) |

- वर्गाने मिळून किंवा वैयक्तिक काही ठळक आर्थिक योगदान करायचे असल्यास नवीन वास्तूतील अपेक्षित सुविधा व जुन्या वास्तूतील नूतनीकरण यांचे तपशीलवार अंदाजपत्रक मेळाव्यात उपलब्ध होईल.
- आत्तापर्यंतच्या वाटचालीचे वृत्त व सुवर्ण महोत्सवी टप्प्याची योजना मेळाव्यात उपलब्ध होईल.